**ठळक बातम्या**

- नागपूर दंगलीत नुकसान झालेल्यांना येत्या ३-४ दिवसात नुकसान भरपाई मिळणार, दंगेखोरांकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- कांदा निर्यातीवरचं २० टक्के शुल्क १ एप्रिलपासून हटवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- अवैध ऑनलाईन गेमिंगशी संबंधित ३५७ संकेतस्थळं बंद, जीएसटी विभागानं गोठवली २ हजार ४०० बँक खाती
- प्रसिद्ध हिंदी साहित्यिक विनोद कुमार शुक्ल यांना यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर

**आणि**

- आयपीएल आजपासून सुरू, सलामीच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध नाणेफेक जिंकून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><><>**

नागपूरमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या दंगलीत सर्वसामान्यांच्या मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई येत्या ३-४ दिवसात देण्याच्या सूचना दिल्या आहेत. दंगलीमध्ये ७१ वाहनांचे तसेच विविध मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीची सर्व रक्कम दंगेखोरांकडून वसूल केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज

दिली. नागपूर शहरातल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते.

**होल्ड - मुख्यमंत्री -१**

नागपूर शहराच्या अकरा पोलीस स्टेशनच्या परिसरात जमावबंदी आदेश लागू केले आहे. लवकरच यात शिथिलता आणू असं आश्वासन त्यांनी दिलं. दंगल प्रकरणी १३ गुन्हे दाखल झाले असून १०४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी १२ विधी संघर्षग्रस्त बालक आहेत. दंगल भडकवण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या विविध समाज माध्यमांवरच्या २५० पोस्ट टाकणाऱ्या ६२ लोकांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून दोघांना अटक केल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड - मुख्यमंत्री- २**

आगामी सण आणि उत्सवाच्या काळात शांतता भंग होणार नाही यादृष्टीने सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी जनतेला केलं. तसेच शांतता भंग करणाऱ्यांविरुद्ध तात्काळ कठोर कारवाई करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी पोलिसांना दिले.

**<><><><><>**

नागपूरमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या हिंसाचारात जखमी झालेल्या एकाचा आज उपचारादरम्यान मृत्यू झाला. इरफान अन्सारी असं या ४० वर्षीय इसमाचं नाव आहे. १७ मार्च रोजी नागपूर इथं झालेल्या हिंसाचारात अन्सारी हे गंभीर जखमी झाले होते.

**<><><><><>**

कांदा निर्यातीवरचं २० टक्के शुल्क १ एप्रिलपासून हटवण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. यासंदर्भातलं परिपत्रक केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या महसूल विभागानं जारी केलं. १३ सप्टेंबर २०२४ पासून हे शुल्क आकारण्यात येत होतं. २०२३-२४ या आर्थिक वर्षात देशातून १७ लाख मेट्रीक टनांहून अधिक कांदा निर्यात झाला आहे. चालू आर्थिक वर्षात १८ मार्चपर्यंत साडे ११ लाख मेट्रीक टनांहून अधिक कांद्याची निर्यात झाली आहे. लासलगाव आणि पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत या महिन्यात कांद्याची आवक वाढल्यानं दर कमी झाले आहेत.

**<><><><><>**

मणिपूरमधे शांतता आणि सौहार्द प्रस्थापित होण्यासाठी तिथल्या लोकांनी एकत्र काम केलं पाहिजे,  असं आवाहन न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं आहे. गवई यांच्या नेतृत्वाखाली सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचं एक शिष्टमंडळ आज हिंसाचारग्रस्त मणिपूरच्या दौऱ्यावर गेलं होतं. गवई यांच्या सह न्यायमूर्ती विक्रम नाथ, एम एम सुंद्रेश आणि के व्ही विश्वनाथन यांनी चुराचांदपूर जिल्ह्यातल्या मदत छावणीला भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

अवैध ऑनलाईन गेमिंगशी संबंधित ३५७ संकेतस्थळं वस्तू आणि सेवा कर विभागाच्या  गुप्तचर यंत्रणेनं बंद केली आहेत. त्यांची २४०० बँक खातीही गोठवल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. परदेशातून चालवल्या जाणाऱ्या ऑनलाईन गेमिंग कंपन्या नोंदणी न करता चालवल्या जात असून यामुळे वस्तू आणि सेवा कराचा भरणा केला जात नसल्यानं वस्तू आणि सेवा कर महासंचालनालयानं सुमारे ७०० कंपन्यांच्या व्यवहारांवर लक्ष ठेवलं आहे.

व्यवहार सुलभरित्या करण्यासाठी या कंपन्यांनी सुरु केलेली बनावट बँक खाती गोठवण्यात आली आहेत. नागरिकांनी केवळ नोंदणीकृत ऑनलाईन मंचाचा वापर करावा असं आवाहन अर्थ मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेसंबंधी तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टालिन यांनी बोलावलेली संयुक्त कृती समितीची बैठक आज चेन्नईत झाली. १९७१च्या जनगणनेवर आधारित मतदारसंघांची रचना आणखी २५ वर्षांसाठी कायम ठेवावी अशी मागणी बैठकीत करण्यात आली. ही मागणी करणारं संयुक्त निवेदन संसदेच्या चालू अधिवेशनादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सादर करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. मतदारसंघांच्या पुनर्रचनेची प्रक्रीया पारदर्शी, आणि सर्व राज्य सरकारं, राजकीय पक्ष आणि संबंधितांशी विचारविनिमय करुनच पुढे न्यावी असा ठराव या बैठकीत मंजूर झाला.

पुनर्रचनेला विरोध नाही, तर पुनर्रचना न्याय्य व्हावी अशी आपली मागणी असल्याचं या बैठकीत स्टालिन म्हणाले. पुनर्रचना करताना देशाच्या विविधतेचं संरक्षण झालं पाहिजे अशी भूमिका केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी मांडली. मतदारसंघाची पुनर्रचना करताना लोकसंख्या हा एकमेव निकष असू नये, तसंच यावर तपशीलवार चर्चा आणि विचारविनिमय करुनच पुढं गेलं पाहीजे असं ओदिशाचे माजी मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांनी म्हटलं आहे. कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही अशा प्रकारे पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री YS जगनमोहन रेड्डी यांनी केली आहे.

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार, तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान हे देखील या बैठकीला उपस्थित होते.

तमिळनाडूतले सध्याचे प्रश्न सोडवता येत नसल्याने मुख्यमंत्री स्टालिन हे केवळ नाटक करत असल्याचा आरोप तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष के अण्णामलाई केला आहे.

<><><><><>

साहित्यक्षेत्रात अतिशय मानाचा मानला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार यंदा प्रसिद्ध हिंदी लेखक, कवी आणि निबंधकार विनोद कुमार शुक्ल यांना जाहीर झाला आहे. ११ लाख रुपये रोख, सरस्वतीची कांस्यप्रतिमा आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. ८८ वर्षांचे शुक्ल, हा पुरस्कार मिळवणारे हिंदीतले बारावे, तर छत्तीसगडचे पहिलेच साहित्यिक आहेत. ‘दीवार में एक खिडकी रहती थी’ या त्यांच्या साहित्यकृतीसाठी १९९९ मध्ये त्यांना साहित्य अकादमी पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. ‘नौकर की कमीज’ ही त्यांची कादंबरी आणि ‘सब कुछ होना बचा रहेगा’ हा त्यांचा काव्यसंग्रहही प्रसिद्ध आहे.

<><><><><>

नायजर मध्ये काल दुपारी एका मशिदीवर झालेल्या हल्ल्यात ४४ जण मृत्युमुखी पडले तर १३ जण जखमी झाले. हल्ल्याचं ठिकाण हे नायजर, बुर्किना फासो आणि माली या तीन देशांच्या सीमावर्ती भागात आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समधे आजच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ४ सुवर्ण पदकांसह ४ रौप्य पदकं पटकावली.

महिला भालाफेकीत महाराष्ट्राच्या भाग्यश्री जाधवला सुवर्णपदक मिळालं. पुरुषांच्या १००मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रणव देसाई आणि महिलांच्या थाळीफेक प्रकारात अक्कुताई उलभागट यांनी सुवर्णपदक पटकावलं. ४०० मीटर धावण्याच्या प्रकारात नाशिकच्या दिलीप गावित यांनी आपलं नाव सुवर्णपदकावर कोरलं.

**<><><><><>**

क्रिकेट रसिकांचं लक्ष लागून असलेल्या आय पी एल अर्थात इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला आजपासून कोलकात्यात सुरुवात झाली. गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातल्या सलामीच्या सामन्यात बंगळुरूनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा कोलकात्याच्या ८ व्या षटकात १ बाद ७० धावा झाल्या होत्या.

आयपीएलचा हा १८ वा हंगाम असून १८ मे पर्यंत साखळी सामने रंगणार आहेत, तर २५ मे रोजी अंतिम सामना होणार आहे.

**//<><><><><>//**